International Journal of Enhanced Research in Educational Development (IJERED) ISSN: 2320-8708, Vol. 11 Issue 1, Jan-Feb, 2023, Impact Factor: 7.326

# रोजगार हमी योजनेच्या धोरण निर्मिती वर प्रभाव टाकणारे घटक

डॉ. अनिल नारायण पाटील[1], प्रा.अनंत रावसाहेब आवळे[2]

[1]प्राचार्य, मुरलिधर नानाजी मोहिते गुरुजी, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, खोडाळा, ता. मोखाडा, जि. पालघर.

[2]कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जव्हार, ता. जव्हार, जि. पालघर.

**गोषवारा:**

रोजगार हमी योजनेची सुरुवातच याच महत्त्वाच्या आधारे झाली की भारतातील ग्रामीण भागात वास्तव्यात असलेली कुशल व कुशल व्यक्तींची संख्या शेतीचा हंगाम त्यामुळे निर्माण होणारी हंगामी बेकारी निरक्षरता तंत्रज्ञानाचा अभाव निसर्गावर आधारित शेती व्यवसाय सतत पडणारा दुष्काळ कुपोषण भूकबळी भांडवलाचा अभाव यासारख्या असंख्य समस्या ग्रामीण भागत मोठ्या प्रमाणात अस्तित्वात होत्या. या सर्वसामान्य जनतेला या समस्याच्या दृष्ट चक्रातून बाहेर काढण्याच्या प्रामाणिक प्रयत्न रोजगार हमी योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात सामाजिक आर्थिक परिस्थितीमध्ये बदल घडून आलेला दिसून येतो.

## प्रस्तावना:

भारतातील ग्रामीण भागातील जनता श्रमशक्तीच्या आधारे विकास करता येईल. अशी कृषी व्यवस्था व त्या द्वारे ग्रामीण भागातील शेती व्यवसायांना गती देणे व उपलब्ध साधन सामोरीचा पुरेपूर वापर करून ग्रामीण भागातील लोकांचा सर्वांगीण विकास साधण्याचा प्रयत्न करण्यासाठी रोहयो योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सदर योजनेची कार्यप्रणाली तयार करण्यात आली. सदर रोहयोच्या धोरण निर्मितीवर भारतीय राज्यघटनेचे कल्याणकारी राज्य निर्मितीचे ध्येय लोकशासन प्रणालीचे तत्व नागरिकांना घटनेने दिलेले मूलभूत अधिकार या अनेक संकल्पनेचा विचार या योजनेत केलेल्या दिसून येतो

**संशोधनाची गृहीतके:**

* जनतेचे हित हेच लोकशाहीचे संरक्षण आहे
* नागरिकांच्या उपजीविकेचे साधन उपलब्ध करून देणे.
* ग्रामीण भागातील उदरनिर्वा साठी होणारे स्थलांतर थांबवण्याचा प्रयत्न.
* मागेल त्याला काम दिले जाते.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत शोधी बंद सादर करताना माहितीचे संकलन करण्याकरिता रोहयोच्या निर्मितीवर प्रभाव टाकणाऱ्या घटकांचा विचार करता रोहो यो ही कल्पना कशी आली. विविध घटकांच्या कशा पद्धतीने या योजनेवर प्रभाव पडत गेला हे पाहण्यासाठी याविषयी लिखाण झालेल्या विविध शोधनिबंधाचा विचार करून सदर शोध निबंध लिहिण्याचा प्रयत्न केला गेला आहे.

**संशोधनाचे महत्त्व:**

**संशोधनाचे  विशदीकरण:**

रोजगार हमी योजनेची निर्मिती करताना कल्याणकारी राज्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे राज्यांमध्ये कृषी क्षेत्रामध्ये श्रमप्रधान कामाच्या माध्यमातून विकासास असणारा मोठा आहे खालील बाबींचा रोजगार हमी योजनेच्या कायदा व नियम निर्मितीवर प्रभाव पडतो.

## रोहयोच्या धोरण निर्मितीवर प्रभाव टाकणारे घटक

**1) कल्याणकारी राज्य निर्मितीचे ध्येय:**

भारतीय घटनेमध्ये समाजवादी समाज रचना निर्माण करणे जनतेच्या कल्याणकारी योजना ची आखणी करणे अशाच तत्वाच्या आधारे ही रोजगार हमी योजना जनतेच्या उपजीविके करिता निर्माण केलेली आहे लोकांचे कल्याण हाच या योजनेचा हेतू आहे सर्वसामान्य जनतेच्या उपजीविकेचे करिता कायदा निर्माण झालेला आहे.

**2) लोकशाही शासन प्रणालीचा स्वीकार:**

भारत देशाने लोकशाही शासन प्रणाली स्वीकारलेले असल्यामुळे लोकांच्या हितासाठी कायदे करणे हे प्रशासनाचे आद्य कर्तव्य आहे अन्यथा शासन व्यवस्था अस्तित होऊ शकते लोकांच्या कल्याणासाठी लोकप्रतिनिधी कार्य करीत असतात. यांचा विचार करणे क्रम प्राप्त असल्यामुळे लोकशाही शासन प्रणालीमध्ये लोकहित्याचा विचार केला जातो हाच विचार लक्षात घेऊन रोजगार हमी योजनेचा विचार करण्यात आलेला आहे.

**3) भारतीय राज्यघटनेने अधिकार या तत्त्वाचा आधार.**

अन्न वस्त्र निवारा हे भारतीय नागरिकाचे मूलभूत अधिकार आहे व ते त्यांना राज्यघटनेने दिलेले आहे. नागरिकांच्या सर्वांगीण विकास साध्य करण्यासाठी हा कायदा अत्यंत महत्त्वाचा आहे या कायद्याच्या आधारावरच भारतीय नागरिकांना उदरनिर्वाहासाठी काम देण्याची जबाबदारी सुद्धा सरकारचीच आहे याच तत्त्वानुसार रोजगार हमी योजनेची कल्याणकारी योजना सुरू करण्यात आलेली आहे.

**4) राज्य धोरणाचा मार्गदर्शक तत्त्वांचा विचार.**

भारतीय नागरिकांना आर्थिक व सामाजिक दृष्ट्या सक्षम करण्यासाठी राज्याची काही मार्गदर्शक तत्वे स्वीकारलेले आहे त्यात प्रामुख्याने नागरिकांना उपजीविकेचे साधन उपलब्ध

करून देणे समान कामासाठी समान वेतन देणे बेरोजगारी नष्ट करणे यासारख्या प्रमुख तत्त्वांच्या आधारे हा सुद्धा रोजगार हमी योजनेच्या निर्मितीमध्ये प्रभाव टाकलेला आहे.

**5) अकुशल कामगारांच्या प्रचंड संख्येचा विचार.**

भारतातील एकूण लोकसंख्येचा विचार करता ग्रामीण भागामध्ये मोठ्या प्रमाणात बेरोजगारीचा प्रश्न गंभीर स्वरूपाचा आहे कारण भारतीय शेती हंगामात पुरतीच मर्यादित आहे हंगामानंतर मोठ्या प्रमाणात बेरोजगारीची समस्या ग्रामीण भागामध्ये दिसून येते आणि ही संख्या प्रचंड आहे त्यामुळे शासनाला या लोकसंख्येला उदरनिर्वाहासाठी रोजगार प्राप्त करून देणे ही काळाची गरज आहे.

**6) निरक्षर जनता:**

भारतामध्ये ज्या पद्धतीची शैक्षणिक प्रगती होण्या गरजेचे होते त्यानुसार आपणास शैक्षणिक क्षेत्रामध्ये प्रगती झालेली दिसून येत नाही त्याला वेगवेगळे कारणे आहेत त्यामध्ये ग्रामीण भागामध्ये मोठ्या प्रमाणात निरीक्षक असल्यामुळे त्यांना या निरक्षरते मधून बाहेर काढण्यासाठी अगोदर त्यांचा अन्न वस्त्र निवारासारख्या मूलभूत गरजांची पूर्तता करणे गरजेचे आहे त्यामुळे हे तत्व सुद्धा रोजगार हमी योजनेच्या निर्मितीवर प्रभाव टाकत आहे.

**7) मजुरीसाठी होणारे स्थलांतर:**

ग्रामीण भागातून शहरी भागामध्ये लोकांचे रोजगारासाठी मोठ्या प्रमाणात स्थलांतर होत असते हे स्थलांतर थांबवणे काळाची गरज आहे कारण ग्रामीण भागात त्यांना शेतीच्या हंगामानंतर रोजगाराची उपलब्ध नसते त्यामुळे उदरनिर्वासाठी मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागातून शहरी भागांमध्ये स्थलांतर होत असते त्याचा परिणाम हा शहरी भागात सुद्धा व ग्रामीण भागात सुद्धा मोठ्या प्रमाणात पडत असतो हे तत्व सुद्धा रोजगार हमी योजनेच्या निर्मितीमध्ये अत्यंत महत्त्वाचे आहे.

## सारांश:

वरील अनेक बाबींचा प्रभाव महाराष्ट्रातील रोजगार हमी योजना निर्माण करण्यासाठी व कार्यपद्धती ठरवण्यास अत्यंत महत्त्वपूर्ण आहे राज्यातील सामाजिक आर्थिक सांस्कृतिक भौगोलिक व नैसर्गिक घटकांचा तसेच भारतीय घटनेतील मूलभूत हक्कांचा प्रभाव हा रोजगार हमी योजनेच्या कार्यप्रणालीवर झालेला दिसून येतो.

## संदर्भ सूची :

१) काकडे सीमा / दिक्षीत प्रांजल – " रोजगाराची अस्ताकडे वाटचाल" – प्रयास प्रकाशन पुणे – २००७.

२) बंगाल दीपक – " रोजगार हमी मार्गदर्शका" – प्रकाशन पुणे.

३) भारत सरकार ग्रामीण विकास मंत्रालय – ग्राम विकास आवश्यक कार्यक्रम मार्गदर्शक पुस्तिका दि. जुलै २००१.